शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.२१/२०२३

| | |
|---|---|
| श्री.जाधव कृष्णत उत्तम<br>मु.पो.सैदापूर, ता.कराड, जि.सातारा | तक्रार अर्जदार |
| विरूध्द् | |
| १. जी.के.गुजर मेमोरिअल चॅरिटेबल ट्रस्ट, कराड, जि. सातारा.<br>२. डॉ.अशोक गुजर टेक्नि.इन्सि. डॉ.दौलतराव आहेर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कराड, जि.सातारा. | वि.प. |

जी.के.गुजर मेमोरिअल चॅरिटेबल ट्रस्ट, कराड, जि. सातारा यांचे डॉ.अशोक गुजर टेक्नि. इन्सि. डॉ.दौलतराव आहेर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कराड, जि.सातारा यांचेकडील सहा. प्राध्यापक श्री.जाधव कृष्णत उत्तम यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.०१/०५/२०२३ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

मी वरील नमूद महाविद्यालयात दि.१६/०१/२०१४ पासून सलगपणे सहा. प्राध्यापक या पदावर कार्यरत आहे. महाविद्यालयाने ऑगस्ट २०२०, ऑक्टोंबर २०२०, डिसेंबर २०२०, मार्च २०२३, एप्रील २०२३ या पाच महिने व फेब्रुवारी २०२१ या महिन्याचे २५ टक्के वेतन असे एकत्रित पाच महिने व एक आठवडयाचे वेतन व्यवस्थापनाने अद्याप मला अदा केलेले नाहीत.

नमूद पगारापैकी ऑगस्ट २०२०, ऑक्टोंबर २०२० व डिसेंबर २०२० या महिन्याचे वेतन इतर कर्मचा-यांना अदा केले आहे. तसेच सुरवातीपासून माझे वेतन व भत्ते हे शासन नियम व शासन दराने अदा करणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी असून ही व्यवस्थापनाने मला नियमाने व नियमित वेतन व भत्ते अदा केलेले नाहीत. मला देण्यात आलेले वेतन व भत्ते शासन दरापेक्षा खूपच कमी आहेत. त्यामुळे माझ्या नेमणूक दिनांकापासून (दि.१६/०१/२०१४ पासून) सहाव्या वेतन आयोगाच्या नियम व तरतूदीनुसार व दि.०१/१/२०१६ पासून सातव्या वेतन आयोगानूसार वेतन व भत्ते देण्यात यावेत.

पाच महिन्यापासून आधिकचे थकीत वेतन असलेने आणि वेतन फारच कमी असलेने माझी प्रचंड आर्थिक कुचंबणा झालेली आहे. तरी सदरील वेतन व फरक तातडीने अदा करण्याचे आदेश पारित करावेत तसेच इथून पुढील वेतन ही सातव्या वेतन आयोगातील तरतूदीनुसार, नियमाने व नियमित देण्यात यावेत ही विनंती.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

तक्रारी ही खालील बाबींबाबत आहे.

१.मार्च २०२०, ऑक्टोंबर २०२०, डिसेंबर २०२०, फेब्रूवारीस २५ टक्के वेतन मार्च २०२३ व एप्रील २०२३ चे वेतन अदा केलेले नाही.

२.वेतन भत्ते शासनापेक्षा कमी दराने आहेत.

३.दि.०१/०१/२०१६ पासून ७ व्या वेतन आयोगानुसार वेतन देण्यात यावे.

**संस्थेचा अभिप्राय :**

हया संबधी कोणतेही पत्र प्राचार्य किंवा संस्थेला दिले नाही.

**समितीची निरिक्षणे :**

१. सुनावणी दरम्यान जी.के.गुजर संस्था व महाविद्यालयातर्फे तक्रारदाराने मागणी केलेल्या ऑगस्ट २०२०, ऑक्टोंबर २०२०, डिसेंबर २०२०, मार्च २०२३, एप्रील २०२३ या पाच महिने व फेब्रुवारी २०२१ या महिन्याचे २५ टक्के वेतन पाच महिने एक आठवडयाच्या पगाराच्या थकबाकीपैकी एप्रील, २०२० व जून, २०२० या दोन महिन्याचा पगार तक्रारदार यांना अदा करण्यात आलेला असून उर्वरित थकीत पगार संस्थेकडे निधी उपलब्ध झालेनंतर देण्याचा प्रयत्न महाविद्यालयाकडून सुरु असल्याचे लेखी निवेदन समितीपुढे सादर करण्यात आले. त्याच्या पुराव्याखातर महाविद्यालयाकडील एप्रील, २०२० व जून, २०२० या महिन्यांच्या पगारपत्रकाची प्रत सादर केली आहे. त्याची पडताळणी केली असता, तक्रारदार यांनी तक्रार अर्जात एप्रील, २०२० व जून, २०२० या महिन्यांचे थकीत वेतनाची मागणीच नमूद केलेली नाही. मात्र महाविद्यालयाकडून एप्रील, २०२० व जून, २०२० या महिन्यांच्या पगारपत्रकाचे स्टेटमेंट देण्यात आलेले असून ते थकीत वेतन तक्रारदार यांना अदा केले असल्याचे नमूद केले आहे. तसेच तक्रारदार यांनी अर्जामध्ये मार्च २०२३ व एप्रील, २०२३ या महिन्यांचे वेतन थकीत असल्याचे नमूद केले आहे. परंतू समितीसमोर तक्रारदार यांच्या सादर केलेल्या बॅंक स्टेटमेंटची पडताळणी केली असता त्यामध्ये मार्च, २०२३ व एप्रील, २०२३ या महिन्यांचे वेतन मे, २०२३ मध्ये महाविद्यालयाने तक्रारदार यांचे खातेवर जमा केले असल्याचे निदर्शनास येते.

सबब उपरोक्त बाबी अवलोकनी घेता तक्रारदार यांच्या ऑगस्ट २०२०, ऑक्टोंबर २०२०, डिसेंबर २०२० व फेब्रुवारी २०२१ या महिन्याचे २५ टक्के वेतन अशा एकूण तीन महिने एक आठवडयाचे वेतन मिळणेची तक्रार समितीकडून विचारात घेण्यात आली. समितीने तक्रादाराच्या उर्वरीत तीन महिने एक आठवडयाच्या थकीत वेतनाची रक्कम ठराविक कालावधीमध्ये तक्रारदारास देण्याचा

प्रस्ताव उभयपक्षापुढे ठेवलेला होता. त्यास संस्था आणि महाविद्यालय राजी होते. तथापि तक्रारदार यांनी तो प्रस्ताव मान्य केलेला नाही. तक्रारदारांनी त्यांनी मागणी केलेल्या कालावधीत पगार देण्यात आलेला नाही ही बाब संस्था आणि महाविद्यालयाने मान्य केलेली असून त्याचे कारण असे दिलेले आहे की, तो कालावधी कोरोना कालावधी असल्याने त्या कालावधीमध्ये संस्थेकडे फंड उपलब्ध न झाल्याने पगार देण्यात आलेला नाही आणि तो फंड उपलब्ध झाल्यानंतर त्यांचा थकीत पगार देण्यात येईल असे मांडण्यात आलेले आहे. संस्था तसेच महाविद्यालयाचे हे म्हणणे कायदेशीर नसून ते मान्य करता येत नाही. पगार देण्याची कायदेशीर जबाबदारी संस्था आणि महाविद्यालय यांच्यावरती आहे. कोणत्याही परिस्थितीत संस्था व महाविद्यालय ही जबाबदारी टाळू शकत नाही. त्यामुळे तक्रादाराचे ऑगस्ट २०२०, ऑक्टोंबर २०२०, डिसेंबर २०२० व फेब्रुवारी २०२१ या महिन्याचे २५ टक्के वेतन असे एकूण तीन महिने एक आठवडयाचे थकीत वेतन संस्था व महाविद्यालयाने अदा करणे आवश्यक असल्याचे समितीचे मत आहे.

२. तक्रारदार यांची दुसरी मागणी अशी आहे की, त्यांना सुरवातीपासून वेतन हे शासन नियम व शासन दराने अदा करणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी असूनही व्यवस्थापनाने नियमाने व नियीमत वेतन व भत्ते अदा केलेले नाहीत. त्यांच्या नेमणूक दिनांकापासून (०१/०७/२०११) सहाव्या वेतन आयोगाच्या तरतूदीनुसार तसेच दि.०१/०१/२०१६ पासून सातव्या वेतन आयोगाच्या तरतूदीनुसार वेतन व भत्ते देण्यात यावेत.

जाब देणा-या तर्फे असे म्हणणे मांडले आहे की, सदरचे महाविद्यालय कायमस्वरुपी विनाअनुदानित तत्वावर चालणारे असून त्यांचे फी शुल्क नियंत्रण समिती ठरवते व मंजूर होणा-या फी वरुनच महागाई भत्ता ठरतो. मागील १० वर्षापासून प्रथम वर्ष अभियांत्रिकीच्या ५० टक्के जागा रिक्त असून प्रथम व द्वितीय वर्ष यांचे सरासरी ७० टक्के एवढे प्रवेश झालेले आहेत. तसेच महाविद्यालयाच्या एकूण उत्पन्नाच्या ८५ टक्के भाग शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पगारावर खर्च होत असून मागील १० वर्षापासून वार्षिक वित्तीय तूट १ ते २ कोटी रुपये इतकी असते व त्याचा विचार करता सर्व शिक्षकांना ६४ टक्के महागाई भत्ता दिला जातो. त्यामुळे तक्रारदारांवर अन्याय होत नाही. तसेच सातवा वेतन आयोग हा कायमस्वरूपी विनाअनुदानित चालणा-या महाविद्यालयाला लागू नाही.

तक्रारदार यांनी याबाबत दिलेल्या लेखी म्हणण्यामध्ये आपली नेमणूक जाबदार यांनी रू. १५६००-३९१०० व एजीपी ६००० या वेतनश्रेणीत केली आहे. या वेतनश्रेणीनुसार मुळ वेतन व त्यावरील कायद्याने देय असणा-या भत्त्यासहीत नियमित देणे आवश्यक आहे. त्यानुसार सहाव्या वेतन आयोगानुसार दि.०१/११/२०११ ते दि.३१/१२/२०१५ पर्यंत वेतनाची मागणी केली आहे. परंतू याबाबत जाबदार यांनी कोणतेही लेखी म्हणणे सादर केले नसून सदरची बाब जाबदारांनी नाकारलेली नसल्याचे नमूद केले आहे. तसेच अखील भारतीय तंत्रशिक्षण परिषदने दि.०१/०३/२०१९ रोजी संपूर्ण

देशातील सर्व तंत्रशिक्षण महाविद्यालयातील शिक्षक कर्मचा-यांना दि.०१/०१/२०१६ पासून सातवा वेतन आयोग लागू केला आहे. सदरचे रेग्युलेशन दि.१९/०९/२०१९ रोजीच्या शासन निर्णयाव्द्वारे महाराष्ट्र राज्यात लागू केले आहे. दि.०८/०३/२०१९ रोजीच्या आदेशाने ७ व्या वेतन आयोगाची पुर्नरचना शिवाजी विद्यापीठाच्या मा.कुलगुरूंनी लागू करण्याबाबतचा आदेश निर्गमित केला असल्याचे म्हणणे मांडले आहे.

उपरोक्त दोन्ही पक्षकारांनी समितीसमोर मांडलेले म्हणणे अवलोकनी घेता समितीचे मत असे की, तक्रारदार यांनी आपल्या म्हणण्यामध्ये जाबदारांनी आपली नेमणूक रू.१५६००-३९१०० व एजीपी ६०००/- या वेतनश्रेणीत केली असल्याचे नमूद केले आहे. सदरची वेतनश्रेणी ही सहाव्या वेतन आयोगातील तरतूदीनुसार असल्याचे निदर्शनास येते. सबब तक्रारदार यांची नियुक्ती सहाव्या वेतन आयोगातील तरतूदीनुसार असणा-या वेतनश्रेणीवर झालेली असल्याचे दिसून येते. तक्रारदार यांनी त्यांना शासन नियमानुसार देय असणारे भत्ते नियमानुसार देण्यात आलेले नसल्याचे नमूद केले आहे. याबाबत समितीचे म्हणणे असे आहे की, नेमणूक आदेशात नमूद केले नुसार वेतन देणे ही संस्था, महाविद्यालयाची जबाबदारी आहे. सबब समिती या निष्कर्शास येते की, तक्रारदार यांच्या नियुक्ती आदेशामध्ये नमूद केलेनुसार देय असणा-या वेतनश्रेणीनुसार वेतन व भत्ते मिळणेस तक्रारदार पात्र आहे.

३. तक्रारदार यांनी दि.०१/०१/२०१६ पासून सातव्या वेतन आयोगातील तरतूदीनुसार वेतन मिळण्याची मागणी केली आहे. याबाबत समितीने सदर तक्रारीच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठाशी सलंग्नीत विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयाना सातवा वेतन आयोग लागू केला आहे किंवा कसे याची विद्यापीठाच्या संबधित विभागाकडून माहिती घेतली असता त्यांच्याकडून दि.०७ सप्टेंबर २०२१ रोजीच्या पत्रान्वये संलग्नित विनाअनुदानित व्यावसायिक महाविद्यालयामधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना लागू करण्याबाबत मा.सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडून मार्गदर्शन मागविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त झालेल्या क्रंमांक २/एनजीसी/२०२२/१५३ अ दि.०७ जानेवारी २०२२ रोजीचे पत्र अवलोकनी घेता त्यामध्ये शासन निर्णय क्रं.सावेआ-१११९/ (८८/१९) ता.शि-२, दि.१६/०९/२०१९ हा शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय होवून त्यानुसार शासनाने निर्णय निर्गमित केला आहे व त्या शासन निर्णयाची अनुज्ञेयता स्पष्ट आहे असे कळविल्याचे दिसून येते. सदर शासन निर्णयाचे अवलोकन करता सातवा वेतन आयोग विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयांना लागू करण्याबाबत कोणतीही स्पष्टता दिसून येत नाही. भविष्यात शासनाकडून याबाबत स्पष्टता आल्यास त्याचा अंमल करणे संस्था, महाविद्यालयाची जबाबदारी असेल. सबब समिती खालील आदेश पारीत करीत आहे.

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

## आदेश

तक्रार अशांत मंजूर करण्यात येत आहे.

१. संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार यांना ऑगस्ट २०२०, ऑक्टोंबर २०२०, डिसेंबर २०२० व फेब्रुवारी २०२१ या महिन्याचे २५ टक्के वेतन असे एकूण तीन महिने एक आठवडयाचे वेतन हा आदेश प्राप्त झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत अदा करावे.

२. संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार यांच्या नियुक्ती आदेशात नमूद केल्यानुसार वेतन व भत्ते अदा करावेत.

३. तक्रारदार यांची सातव्या वेतन आयोगाची मागणी नामंजूर करण्यात येत आहे.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधितांना देऊन तसे कळविण्यात यावे.

दिनांक : 04 APR 2024

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)